# शिरसाट यांच्या वक्तव्याची महिला आयोगाकडून दखल

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

शिवसेना ठाकरे गटाच्या फायर ब्रँड उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यावर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी राज्य महिला आयोगाने दखल घेतली आहे. यासंदर्भात तपासून कारवाई केली जाईल, अशी ग्वाही महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर येथे एका सभेत अंधारे यांच्याविरोधात बोलताना आमदार शिरसाट यांनी काही आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. याप्रकरणी अंधारे यांनी राज्य महिला आयोगाकडे विनयभंगाची तक्रार दाखल केली आहे.

आमदार शिरसाट यांचे वक्तव्य अत्यंत हीन आणि लज्जास्पद असून, अत्यंत अवमानकारक आणि विनयभंग करणारे आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अंधारे यांनी केली आहे.

दरम्यान, आमदार शिरसाट यांच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करावा, अशा तक्रारीचे पत्र विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर पोलिस ठाण्यात दिले आहे. शिरसाट यांच्याविरोधात भा.दं.वि.च्या कलम ३५४(अ) अन्वये विनयभंगाचा गुन्हा दाखल करावा, अशी तक्रार दानवे यांनी केली आहे.

महिला आयोगाकडे तक्रार दाखल झाल्यानंतर आमदार शिरसाट म्हणाले, मी काहीही चुकीचे वक्तव्य केलेले नाही. कोणीही आमच्यावर टीका करावी आणि आम्ही गप्प बसावे, असे होणार नाही. माझ्याविरोधात तक्रार दाखल झाली असली, तरी मी काही घाबरत नाही.

पुढारी . २८/३/२३